दिनांक: - 1 DEC 2018

**उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) [Dy.Executive Engineer(Civil)] या पदाच्या १:२ प्रमाणात पार पाडण्यात आलेल्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेअंती अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी.**

**संदर्भ:-** महानिर्मिती जाहिरात क्र.०२ (Feb)/२०१८

---

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०२ (Feb)/२०१८ अन्वये उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदाची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर पदाच्या रिक्त जागांच्या भरतीसाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत उमेदवारांना १८० गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणांचे ९० गुणांमध्ये व वैयक्तिक मुलाखत परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांचे १० गुणात रुपांतरण करुन अशी एकूण १०० गुणांच्या आधारे तसेच समांतर आणि सामाजिक आरक्षण विचारात घेऊन व खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी तयार करण्यात आलेली आहे.

१) उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदाची निवड यादी तयार करताना खुल्या प्रवर्गातील (Open Category) उमेदवारांच्या निवडीकरीता ४० गुणांचा व मागास प्रवर्गातील (Backward Class) उमेदवारांच्या निवडीकरीता ३० गुणांचा निकष लावून त्याआधारे सदरील यादी तयार करण्यात आलेली आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदाची निवड यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

३) उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदाची निवड यादी ही घोषित केल्याच्या तारखेपासून ०१ वर्षाकरीता वैध असेल.

४) जाहिरात क्र.०२(Feb)/२०१८ च्या भरती प्रक्रियेचा अभिलेख निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून तीन (३) महिन्याच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल. त्यापुढील काळात कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही,याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

५) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

वैयक्तिक मुलाखत परीक्षेअंती निवड झालेल्या उमेदवारांची निवड यादी प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवारांनी खालील ठिकाणी क्लिक ←करावे.

**उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) [Dy.Executive Engineer(Civil)] या पदाच्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेअंती निवड झालेल्या उमेदवारांची निवड यादी.** ←

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती